# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.01.2025** **वारःगुरुवार**

---

1. रस्ते अपघातातील जखमी व्यक्तींसाठी रोख-विरहित उपचार योजना, देशात गेल्या वर्षभरात 1 लाख 80 हजार व्यक्तींचा रस्ते अपघातात मृत्यू
2. राज्यात दस्त नोंदणीसाठी एकच योजना
3. अंमली पदार्थविरोधी लढ्यात सर्वांनी सहभागी होण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन
4. पुण्यात खड्डेमुक्त रस्त्यांसाठी महत्वाकांक्षी प्रकल्प
5. रत्नागिरीत आजपासून तिसरा सागर महोत्सव आणि
6. गडचिरोलीत दोन महिला नक्षलवादी शरण

**<u>रस्ता सुरक्षा-गडकरी</u>**

रस्ते अपघातातील जखमी व्यक्तींसाठी रोकडविरहित उपचार योजना सुरू करण्यात आल्याची माहिती केंद्रिय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. सर्व राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या वाहतूक मंत्र्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या योजनेअंतर्गत शासन जखमी व्यक्तीवरील उपचारांसाठी दीड लाख रुपयांपर्यंतची रक्कम देणार असल्याचं त्यांनी सांगितलं. धडक आणि पलायन प्रकरणातल्या मृतांच्या वारसांना दोन लाख रुपये दिले जातील अशी माहिती त्यांनी या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

देशात गेल्या वर्षभरात 1 लाख 80 हजार व्यक्तींचा रस्ते अपघातात मृत्यू झाला. यातले 66 टक्के 18 ते 34 वर्ष वयोगटातले होते. याचा अर्थ दररोज सरासरी 493 आणि दर तासाला 20 लोकांचा मृत्यु रस्ते अपघातात होत असतो. शाळा महाविद्यालयांच्या प्रवेशद्वारांजवळ योग्य व्यवस्था नसल्यामुळं सुमारे 10 हजार मुलांचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची माहिती गडकरी यांनी दिली.

**<u>मुख्यमंत्री-आढावा बैठक</u>**

राज्यातल्या कोणत्याही भागातील नागरिकाला राज्यातल्या कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी करता यावी यासाठी 'वन स्टेट वन रजिस्ट्रेशन' संकल्पना राबवणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत महसूल विभागाच्या बैठकीत सांगितलं. तसंच घरबसल्या दस्त नोंदणी करण्यासाठी महसूल विषयक काही दस्त नोंदणीसाठी फेसलेस प्रणाली राबवण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यात जमीन मोजणीसाठी जीआयएस तंत्रज्ञानावर आधारित ई-मोजणी लागू करण्यात येणार आहे. भूमी अभिलेख विभागातील सर्व सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी पहिल्या टप्प्यात 30 कार्यालयांमध्ये भू प्रमाण केंद्र सुरू करण्यात येणार आहे अशी माहिती त्यांनी दिली.

आपले सरकार सेवा पोर्टलच्या ऑनलाईन सेवांमध्ये वाढ करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी राज्य सेवा हक्क आयोगाच्या बैठकीत दिले. तर राज्य उत्पादन शुल्क विभागानं महसूल वाढवण्यासाठी नवनवीन संकल्पना अंमलात आणून आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं महसूल वाढवण्यावर भर द्यावा, असे निर्देश त्यांनी उत्पादन शुल्क विभागाच्या बैठकीत दिले. गुन्हेगारांना वचक बसावा अशा पद्धतीनं कार्यप्रणाली आखण्यात यावी. अवैधरित्या मद्य निर्मिती, वाहतूक आणि विक्रीला आळा घालण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात असंही त्यांनी सांगितलं. आगामी शंभर दिवसांच्या आराखड्याच्या अनुषंगानं आयोजित या बैठकांना संबंधित खात्यांचे मंत्री आणि अधिकारी उपस्थित होते.

**मुख्यमंत्री-अमली पदार्थ-नवीमुंबई**

अमली पदार्थाविरोधातली लढाई आपण एकट्यानं लढू शकत नाही मात्र पोलिस विभागाला महत्त्वाची माहिती देऊन आपण या लढ्यात सहभागी होऊ शकतो असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल व्यक्त केलं. नवी मुंबई पोलिसांच्या नशामुक्त नवी मुंबई या अभियानाचा प्रारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. ही देशाची लढाई असून यामध्ये सहभागी व्हा असं आवाहन त्यांनी उपस्थितांना केलं.

**मुख्यमंत्री-संग्रहालय**

एखाद्या शहराची श्रीमंती तिथं राहणाऱ्या श्रीमंत लोकांवरून किंवा मोठ्या इमारतींवरून नाही तर तिथल्या संग्रहालयांच्या माध्यमातून दिसून येते असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत डॉक्टर भाऊ दाजी लाड नूतनीकृत संग्रहालयाचं लोकार्पण करताना सांगितलं. या संग्रहालयाच्या नूतनीकरणासाठी हातभार लावलेल्या सर्वांचं मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केलं.

**मराठी भाषा**

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबाबतचा केंद्र सरकारचा अध्यादेश काल केंद्रिय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्याकडे सुपूर्द केला. महाराष्ट्रातल्या तसंच जगभरातल्या मराठी भाषिक लोकांसाठी हा स्वप्नपूर्तीचा क्षण आहे अशी प्रतिक्रिया सामंत यांनी यावेळी दिली. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर प्रस्थापित नियमावलीनुसार होणाऱ्या लाभांच्या रुपरेषेबाबतचा प्रस्ताव राज्य सरकार लवकरच केंद्र शासनाकडे पाठवेल असं सामंत यांनी सांगितलं.

**खड्डे-पुणे**

पुण्यात सतत टिकेचं लक्ष्य झालेल्या खड्डेयुक्त रस्त्यांवर उपाय म्हणून पुणे महापालिकेनं एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. पुणे महापालिकेचे उपायुक्त आणि पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी आकाशवाणीला या प्रकल्पाबाबत माहिती दिली...

**शहर डासमुक्त-सिंधुदुर्ग**

तिकडे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कुडाळ नगर पंचायतीचे सर्व नगरसेवक आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांनी एकत्र येत शहर डासमुक्त करण्याचे प्रयत्न सुरु केले आहेत. चांगल्या कामामध्ये राजकारण न करता सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याचा सकारात्मक संदेश देणाऱ्या या उपक्रमाबद्दल आमच्या प्रतिनिधीकडून...

**स्वच्छता कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेऊन खराब झालेल्या कचरा कुंड्यांची स्वखर्चातून डागडुजी केली. अशा पाच कचरा कुंड्यापासून त्यांनी गप्पी मासे पैदास केंद्रासाठी पाण्याच्या टाक्या तयार केल्या. नगर पंचायतचे आरोग्य सभापती मंदार शिरसाट यांनी गप्पी मासे उपलब्ध करून दिले. त्यासाठी लागणारे ऑक्सिजन युनिट विरोधी नगरसेवक गटनेते विलास कुडाळकर यांनी दिले. या सर्वांच्या प्रयत्नातून आज कुडाळ शहरात गप्पी मासे पैदास केंद्राची उभारणी करण्यात आली. त्यातले काही गप्पी मासे आज दोन नाल्यात सोडण्यात आले. या केंद्रातून तयार होणारे गप्पी मासे नागरिकांना मोफत दिले जाणार आहेत. नागरिकांनी आपल्या घराच्या आसपासच्या पाणथळ जागेत हे मासे सोडल्यास मच्छरांच्या अळ्यांचा नायनाट होईल आणि हळूहळू शहर मच्छरमुक्त होईल अशी हि योजना आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी, निलेश जोशी, सिंधुदुर्ग.**

**सागर महोत्सव-रत्नागिरी**

रत्नागिरीत आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या सागर महोत्सवाचं उद्घाटन आज होणार आहे. समुद्र या विषयाच्या विविध पैलूंवर आधारित अभ्यासपूर्ण व्याख्यानं, परिसंवाद, लघुपट सादरीकरण, समुद्रकिनारा अभ्याससहल, कांदळवन क्षेत्रभेट

असे कार्यक्रम या महोत्सवात होणार आहेत. 12 जानेवारीपर्यंत या महोत्सवाचं आयोजन आसमंत बेनीव्होलन्स फाउंडेशननं केलं असल्याचं आसमंतचे संस्थापक संचालक नंदकुमार पटवर्धन यांनी काल सांगितलं. महोत्सवामध्ये रत्नागिरीचं गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, शिरगावचं मत्स्य महाविद्यालय, गोव्याची राष्ट्रीय समुद्रविज्ञान संस्था, पुण्यातली गोखले संस्था, इकॉलॉजिकल सोसायटी, मुंबईतलं कोस्टल कॉन्झर्वेशन फाउंडेशन आदी संस्थांचा सहभाग आहे.

**दीक्षांत-जळगाव**

उच्च शिक्षणातील सकल नोंदणीचं प्रमाण पुढील दहा वर्षात 50 टक्क्यांपर्यंत वाढविण्याची मोठी जबाबदारी शिक्षणक्षेत्रातील सर्व घटकांवर मोठी जबाबदारी असल्याचं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात बोलताना सांगितलं. या समारंभात दहा विद्यार्थ्यांना राज्यपालांच्या हस्ते सुवर्णपदक तर 22 हजार 515 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. मुलींच्या वसतिगृहाचं उद्घाटनही राज्यपालांच्या हस्ते झालं.

**स्नानगृह**

कांदिवली इथं महिलांसाठी पहिल्या अत्याधुनिक आणि उच्च दर्जाच्या फिरत्या स्नानगृहाचं पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते काल उद्घाटन करण्यात आलं. झोपडपट्टीमधील भगिनींना या स्नानगृहांचा अतिशय लाभ होणार आहे. कांदिवली विधानसभा क्षेत्रात 12 तासांसाठी हे फिरतं स्नानगृह महिलांना वापरता येणार आहे.

**स्वच्छता-धाराशिव**

सामान्य नागरिकांचं दैनंदिन जीवन सुकर व्हावं सात कलमी कृती कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंम्बासे यांनी काल विविध कार्यालयांना भेट देऊन कार्यालय प्रमुखांना येत्या शंभर दिवसात प्राधान्यानं करावयाच्या कामांबाबत सूचना दिल्या. या सूचनांवर काय कार्यवाही केली याबाबत 15 एप्रिलला मुख्यमंत्री आढावा घेणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**नक्षली आत्मसमर्पण-गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यात दोन महिला नक्षलवाद्यांनी काल पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. शामला पुडो आणि काजल वड्डे असं नाव असलेल्या या दोघींवर चकमक, जाळपोळ आणि अन्य गुन्ह्यांची नोंद आहे. शासनानं या दोघींवर मिळून 10 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

**हवामान**

मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत घट झाली असून काल राज्यात सर्वात कमी किमान तापमान जळगांव इथं 8 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.